# जिल्हा एकात्मीक आरोग्य व कु. क. सोसायटी, रत्नागिरी

# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## जाहीरात

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हा एकात्मीक आरोग्य व कु. क. सोसायटी, रत्नागिरी अखत्यारित निव्वळ कंत्राटी स्वरुपातील दि. ३१/०३/२०१८ पर्यंत करार तत्वावर नियमीत लसीकरण कार्यक्रमांतर्गत मंजुर पदासाठी पात्र व इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

अ) नियमीत लसीकरण कार्यक्रम :-

| अ. क्र. | पदाचे नाव | रिक्त पदांची वर्गवारी | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अ जा | अज | विजा | भ. ज.ब | भ.ज. क | भ.ज. ड | वि.मा. प्र. | इमाव | खुले | एकूण |
| १. | लसीकरण क्षेत्र सहनियंत्रक (एकत्रित एकूण मासिक मानधन रु.१५०००/- + फिरती भत्ता रु. ५०००/-) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ३ |

उपरोक्त पदास आवश्यक शैक्षणीक अर्हता :- कोणत्याही शाखेचा पदवीधर

कमाल वयोमर्यादा :- १) खुला प्रवर्ग ३८ वर्षे २) अ. जाती प्रवर्ग ४५ वर्षे राहील.

आरोग्य विभागाशी संबंधित शासकीय संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था मधील कामाच्या अनुभवास प्राधान्य.

१) सुचना :

१) वरील पदे निव्वळ कंत्राटी स्वरुपाची आहेत, पदसंख्येमध्ये बदल होऊ शकतो.
२) सदरची भरती प्रक्रिया स्थगित करणे अथवा पूर्णपणे रद्द करण्याचे अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवलेले आहेत.
३) उमेदवाराची निवड ही कोणत्याही शाखेतील पदवी शैक्षणिक पात्रतेवर करण्यात येईल. पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका तसेच लसीकरण कार्यक्रम, पल्स पोलिओ कार्यक्रम संनियत्रणाचा अनुभव असल्यास प्राधान्य राहील.
४) वरील पदांना कोणतेही इतर भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.
५) निवड झालेल्या उमेदवाराला दिनांक ३१.०३.२०१८ पर्यंत नेमणुक दिली जाईल.
६) निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.
७) निवड झालेल्या उमेदवारांना समितीने तयार केलेल्या अटी व शर्ती मान्य कराव्या लागतील व १००/- रुपयाचे करारपत्रक सादर करावे लागेल.
८) स्थानिक क्षेत्राचे ज्ञान असणाऱ्या व रहिवासी असणाऱ्या उमदवारांस प्राधान्य देण्यात येईल.
९) उमेदवारांस मराठी व इंग्रजी विषयाचे उत्तम ज्ञान असणे आवश्यक आहे.
१०) उमेदवाराकडे स्वतःची दुचाकी असणे आवश्यक आहे.

२) आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती -

१) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे २) शाळा सोडल्याचा दाखला/जन्मतारखेचा दाखला.
३) अनुभवाची प्रमाणपत्रे ४) पासपोर्ट आकाराचे एक फोटो ५) जात प्रमाणपत्रची सांक्षाकिंत प्रत

३) अर्ज करण्याची पध्दत :-

१) इच्छुक व पात्र उमेदवारांनी सोबत दिलेल्या नमुन्यात A4 आकाराच्या पांढऱ्या जाड कागदावर एका बाजुस टंकलिखीत अथवा मुद्रीत करुन सुवाच्य अक्षरात भरलेला अर्ज सादर करावा.

२) अर्जाचा समावेश असलेल्या लिफाफयावर वरील बाजुस ठळक अक्षरात "लसीकरण क्षेत्र सहनियंत्रक " पदाकरीता अर्ज असे नमुद करण्यात यावे. परिपुर्ण अर्ज जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसापावेतो खालील पत्यावर कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा टपालाने पोहचतील अशा रितीने पाठविण्यात यावे. विहित मुदती नंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तव्दतच पोष्टाच्या दिरंगाईमुळे अर्ज प्राप्त होण्यास उशिर झाल्यास अर्ज विचारात घेतला जाणार नाही. मा.जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवण, जिल्हा परिषद रत्नागिरी, ता.जि.रत्नागिरी पि.को.४१५६१२.

३) उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्जावर ओळखपत्राच्या आकाराचे स्वतःचे अलिकडील काळातील छायाचित्र चिकटविणे आवश्यक आहे.

४) उमेदवाराने अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, मागासवर्गीय असल्यास याबाबतच्या जातप्रमाणपत्रांच्या ससाक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. असे न केल्यास अर्ज अपुर्ण समजुन तडकाफडकी नाकरण्यास योग्य समजला जाईल. तसेच उमेदवाराने अर्जासोबत कोणत्या प्रमाणपत्राच्या मुळ प्रती जोडु नये.

४) सदोष अर्ज :-

❖ या जाहिरातीत दिलेल्या विहित नमुन्यानुसार नसलेले अर्ज.

❖ अर्जावर स्वतःचे छायाचित्र नसल्यास.

❖ सुवाच्च नसलेले, अपुर्ण किंवा चुकीची किंवा विसंगत माहिती भरलेले किंवा स्वाक्षरी नसलेले अर्ज.

❖ विहित मुदती नंतर प्राप्त अर्ज.

❖ विहित अर्हता धारण करीत नसलेले अर्ज.

❖ शैक्षणिक अर्हता वय, मागासवर्गीय असल्याबाबत इत्यादी बाबतचे प्रमाणपत्र.

५) विशेष सूचना :-

१) सदरहु जाहिरातीस अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज विहित मुदतीत प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापुर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

२) सदर जाहिरातीतील उल्लेख केलेली वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अटी संबंधित पदासाठी आवश्यक असलेली पात्रता दर्शवितात.

३) मा. सह संचालक (अतांत्रिकी), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे जाक्र.राआसो/मनुष्यबळ/आरक्षकण/ २४५४६-७७४/२०१६ दि.२०/७/२०१६ रोजीच्या पत्रा नुसार आवश्यक असणाऱ्या आरक्षित संवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करण्याऱ्या इतर संवर्गातील उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

४) विहित नमुन्यानुसार / निकषानुसार अर्ज नसल्यास सदर अर्ज नाकारण्याचा आधिकार स्वतःकडे राखुन ठेवला असुन या संदर्भात उमेदवारास काहीही कळविण्यात येणार नाही. पात्रता, अर्जाची स्विकृती किंवा तो नाकारणे, चुकीची माहिती दिल्यावर शिक्षा व निवड पध्दती याबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहिल. याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.पदभरतीची प्रक्रीया अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीतने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये. निवडीसाठी शिफारस अथवा दबाव आणल्यास उमेदवार अपात्र ठरविला जाईल.

सही/-

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद रत्नागिरी
तथा अध्यक्ष निवड समिती

# अर्जाचा नमुना

अर्जाचा नोंदणी क्रमांक
(जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयाने भरावयाचे)

| |
|---|
| |

| |
|---|
| |

(फोटोवर उमेदवारांची स्वाक्षरी)

प्रति,
मा.जिल्हा आरोग्य अधिकारी,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवण,
जिल्हा परिषद रत्नागिरी

विषय - .............................पदाकरिता अर्ज.

१) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) :- ..............................................

२) संपूर्ण पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोडसहीत) : - ............................................
..............................................
..............................................
..............................................

दूरध्वनी क्रमांक (असल्यास) :- ................... ई मेल :- .........................

३) जन्मतारीख :-

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

४) अर्ज करतेवेळीचे वय :-

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

५) जात व प्रवर्ग :-

६) लिंग :- पुरुष / स्त्री

७)सेवायोजन कार्यालयातील नोंदणी क्रमांक :-

७) शैक्षणिक अर्हता :

| अ.क्र. | अर्जदाराची शैक्षणिक अर्हता उत्तीर्ण झालेल्या परीक्षांचा तपशिल | विदयालयाचे/परीक्षा मंडळाचे नाव | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | घेतलेले भाषा विषय | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| अ | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| ब | इतर शैक्षणिक अर्हता | | | | |

८) अनुभवाचा तपशिल :

| संस्था | पद | पासून | पर्यंत | एकुण वर्ष/महिने | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

## उमेदवारांनी स्वाक्षरी करावयाचे प्रमाणपत्र

मी असे प्रमाणित करतो/करते की, जाहिरातीतील सूचना मी काळजीपूर्वक वाचल्या आहेत. त्यानूसार मी वरील माहिती भरुन दिलेली आहे.अर्जात दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास या माहितीच्या आधारे नोकरी गमावल्यास मी बाध्य राहिल व त्याबद्दल माझी कोणतीही तक्रार नाही.

अर्जदाराची सही

ठिकाण :
दिनांक :

(नाव : )